जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दि. ०९-०१-२०२०

तरुण भारत

# विद्यापीठाच्या राज्यशास्त्रविभागामध्ये चर्चासत्राचे आयोजन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा राज्यशास्त्र अधिविभाग आणि शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषद, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. तसेच महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेच्या ३७ व्या अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १० व ११ जानेवारी रोजी हे चर्चासत्र होणार आहे. 'राज्यशास्त्रामधील समकालीन समस्या' या विषयावर हे चर्चासत्र होणार असल्याची माहिती अधिविभाग प्रमुख डॉ. रवींद्र भणगे यांनी दिली.

**राज्यशास्त्रामधील समकालीन समस्यांवर राष्ट्रीय चर्चासत्र**

शुक्रवार, १० रोजी सकाळी १० वाजता खासदार संजय मंडलिक यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्‌घाटन होणार आहे. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. संमेलनाध्यक्ष म्हणून डॉ. विलास आवारी उपस्थित राहणार आहेत. मोईन शाकीर, भा. ल. भोळे यांच्यासह माजी कुलगुरू डॉ. राजन हर्षे यावेळी संबोधित करणार आहेत. अधिवेशनास वैभव नायकवडी यांच्यासह डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. वासंती रासम, डॉ. पी. डी. देवरे, डॉ. प्रशांत अमृतकर, डॉ. प्रमोद पवार, डॉ. मोहन काशीकर, डॉ. राजेश खरात, डॉ. भालबा विभूते, डॉ. डी. यु. पवार, डॉ. बी. बी. पाटील, डॉ. सिकंदर जमादार, डॉ. बाळासाहेब भोसले आदी उपस्थित राहणार आहेत.

राज्यशास्त्र अधिविभागाची स्थापना ७ ऑक्टोबर १९७० रोजी झाली. यंदाचे वर्ष राज्यशास्त्र अधिविभागाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. या वर्षाची सुरूवात दि. ७ ऑक्टोबर २०१९ रोजी 'गांधी विचार : राजकारण आणि धर्म" या राष्ट्रीय चर्चासत्राने झाली. त्यानंतर वर्षभरात विभागांतर्गत विविध उपक्रम आयोजित केल्याचेही डॉ. भणगे यांनी सांगितले.

पत्रकार परिषदेस अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, डॉ. प्रकाश पवार, डॉ. टी. एम. पाटील, डॉ. विजय देठे, डॉ. प्रवीण कोडोलीकर आदी उपस्थित होते.

लोकमत

शिवाजी विद्यापीठात संशोधनाचा 'आविष्कार'; कोल्हापूर, सांगली, साताऱ्यातील विद्यार्थी, शिक्षकांचा सहभाग

# सायकलवरील हातपंप, 'थर्ड आय'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सायकलवर चालणारा हातपंप आणि ठिंबक सिंचन व्यवस्था, दिव्यांग व्यक्तींसाठीचा 'थर्ड आय', गव्हाच्या पिठापासून बनविलेला चमचा, अपघात रोखणारी स्मार्ट स्ट्रीट लाईट, आदी स्वरूपातील संशोधनाचा 'आविष्कार' शिवाजी विद्यापीठात विद्यार्थ्यांना बुधवारी पाहायला मिळाला.

शिवाजी विद्यापीठस्तरावरील 'आविष्कार' हा संशोधन महोत्सव विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात आयोजित केला होता. त्याचे उद्घाटन प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी, मध्यवर्ती आविष्कार संशोधन महोत्सवाचे समन्वयक डॉ. एस. बी. महाडिक, डॉ. एस. बी. सादळे, आदी उपस्थित होते. या महोत्सवात कोरगावच्या डी. पी. भोसले कॉलेजच्या अंकिता जाधव, प्रियांका यादव, शुभम लवळे यांनी टाकाऊ साहित्याच्या वापरातून साकारलेल्या सायकलवर चालणारा हातपंप आणि ठिंबक सिंचन व्यवस्थेचा प्रकल्प मांडला. रामानंदनगर-बुर्ली (ता. पलूस) येथील ए. एस. सी. कॉलेजच्या सत्यम तिरमारे याने अपघात रोखणाऱ्या 'स्मार्ट स्ट्रीट लाईट'चे संशोधन सादर केले. विद्यापीठातील कॉम्प्युटर सायन्सच्या रोहित पाटील आणि सूरज कुंभार यांनी दिव्यांगांसाठीचा 'थर्ड आय' हा मोबाईल ॲपशी जोडण्यात आलेला चष्मा सादर केला.

वाळवा येथील क्रांतिसिंह नाना पाटील कॉलेजमधील पूजा माळी हिने प्लास्टिक चमच्याला पर्याय म्हणून गव्हाच्या पिठापासून बनविलेला चमचा सादर केला. महागाव येथील एस.जी.एम. कॉलेजच्या महेश अंगज, स्वप्नाली घोरपडे यांनी शेतीमध्ये सौरऊर्जा निर्मितीबाबतचे संशोधन मांडले. विविध संशोधन प्रकल्पांसह भित्तीपत्रके मांडली. यामध्ये कोल्हापूर जिल्हा पिशवी खोऱ्यातील जलयुक्त शिवार योजनेचा सूक्ष्म अभ्यास, सोशल मीडियाचा वापर, महिला सक्षमीकरण, आर्दीबाबतच्या भित्तीपत्रकांचा समावेश होता. विविध संशोधन प्रकल्पांची माहिती विद्यार्थी-विद्यार्थिनी बारकाईने घेत होते. सायंकाळपर्यंत त्यांची या ठिकाणी गर्दी होती. दरम्यान, युजी, पीजी, पीपीजीच्या विद्यार्थी आणि शिक्षकांनी (पीएडीसाठीची नोंदणी) एकूण २८५ प्रकल्प या महोत्सवात सादर केले.

प्रकल्पांची संख्या यंदा वाढली आहे. विविध सहा गटांतील प्रत्येकी तीन विजेत्यांची राज्यस्तरीय महोत्सवासाठी निवड होणार असल्याचे समन्वयक डॉ. सादळे यांनी सांगितले.



शिवाजी विद्यापीठात बुधवारी आविष्कार संशोधन महोत्सवात कोरेगावच्या डी. पी. भोसले कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सायकलवर चालणाऱ्या हातपंपाचा प्रकल्प सादर केला.



शिवाजी विद्यापीठात बुधवारी आविष्कार संशोधन महोत्सवात महागावच्या एस.जी.एम. कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी शेतीमध्ये सौरऊर्जा निर्मितीबाबतचे संशोधन सादर केले.

## नवसंकल्पना, संशोधनाची गरज

देशाच्या मजबूत बांधणी आणि प्रगतीसाठी नवसंकल्पना, संशोधनाची गरज आहे. समाजातील विविध स्वरूपातील समस्या सोडविण्यासाठी तंत्रज्ञान आणि संशोधनाचा उपयोग करण्याचे काम विद्यापीठ आणि महाविद्यालय पातळीवरील संशोधकांकडून व्हावे, असे आवाहन प्र-कुलगुरु डॉ. शिर्के यांनी यावेळी केले.

" समाजासाठी उपयुक्त ठरणाऱ्या नवसंकल्पना आणि संशोधनाची माहिती या महोत्सवातून मिळाली. विद्यार्थ्यांनी अत्यंत चांगले, वेगळ्या विषयांबाबतचे संशोधन या महोत्सवात सादर केले.

**-ऐश्वर्या भोसले, इस्लामपूर**

" विज्ञान, अभियांत्रिकी, शेती व पशुसंवर्धन, वाणिज्य, व्यवस्थापन व कायदा, अशा विविध क्षेत्रांतील संशोधन या महोत्सवात पाहायला मिळाले. संशोधनाला चालना देण्यासाठी हा महोत्सव महत्त्वपूर्ण ठरणारा आहे.

**- बाळकृष्ण लिमये, कोल्हापूर.**

लोकमत



शिवाजी विद्यापीठात बुधवारी ग्रंथदिंडीने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचा बुधवारी प्रारंभ झाला. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यानी पालखीपूजन केले. यावेळी रणधीर शिंदे, व्ही. टी. पाटील, नमिता खोत उपस्थित होते.

# ग्रंथदिंडीने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचा प्रारंभ

## विठुमाउलीचा गजर; टाळ मृदंगाची साथ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विठुमाउलीचा गजर आणि त्याला टाळ मृदंगाची साथ, पारंपरिक वारकरी भजने अशा भक्तिमय, उत्साही वातावरणात निघालेल्या ग्रंथदिंडीने शिवाजी विद्यापीठाच्या मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचा बुधवारी प्रारंभ झाला. मराठी भाषेच्या अनुषंगाने अनेकविध कार्यक्रम, उपक्रमांचे आयोजन मराठी अधिविभागाने केले आहे.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर सकाळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते पालखी पूजनाने ग्रंथदिंडीचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. अक्षय सरवदे, नंदकुमार मोरे प्रमुख उपस्थित होते. या ग्रंथदिंडीत विठ्ठल मंदिर भजनी मंडळ (मंगळवार पेठ), महादेव रामचंद्र यादव ग्रुप भजनी मंडळ (टोप), पांडुरंगनगरी महिला भजनी मंडळ (कोल्हापूर) यांच्यासह महे, कसबा बीड, कासारवाडी, पाचगाव, प्रयाग चिखली, सिद्धनेर्ली, हणमंतवाडी येथील भजनी मंडळांसह सांगलीच्या विलिंग्डन महाविद्यालयातील ३० विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले. मुख्य इमारतीपासून ते वि. स. खांडेकर भाषाभवनपर्यंत निघालेल्या या दिंडीमुळे विद्यापीठातील अवघे वातावरण नादमय होऊन निघाले. दिंडी भाषाभवन येथे पोहोचल्यानंतर सभागृहामध्येही पारंपरिक वारकरी भजनाचे भक्तिमय वातावरणात सादरीकरण झाले.

### कार्यशाळा, परिसंवाद

या मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यांतर्गत ग्रंथ प्रकाशन, युनिकोड कार्यशाळा, लेखक-विद्यार्थी संवाद, परिसंवाद, प्रमाण मराठी लेखन कार्यशाळा आणि म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार वितरण सोहळा, आदी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांनी घडविला 'आविष्कार'

## विद्यापीठात आविष्कार महोत्सवास प्रारंभ

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

अंगणातील तुळशीच्या पानापासून टेस्टी आयुर्वेदिक आइस्क्रिम, पाम तेलापासून बायोइंधन, सौरऊर्जेवर चालणारी सिंचन यंत्रणा, गायीच्या दुधापासून पौष्टीक इंस्टंट शिरा, अशा हटके संशोधनातून नवकल्पनांचा आविष्कार बुधवारी विद्यार्थ्यांनी घडवला. समाजातील सद्यःस्थितीतील समस्या, त्यावरील उपाय यांची सांगड घालत विद्यार्थ्यांनी संशोधित केलेल्या प्रकल्पांविषयीची माहिती देत यानिमित्ताने तरुणांमधील संशोधकांना चालना देण्यात आली.

शिवाजी विद्यापीठांतर्गत आविष्कार महोत्सव बुधवारी शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात झाला. प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते या महोत्सवाचे उद्घाटन झाले.

महोत्सवात १९७ पोस्टर प्रदर्शन

अर्जुन यकळकर



शिवाजी विद्यापीठातील आविष्कार या संशोधन महोत्सवात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या संशोधन प्रकल्पांची मांडणी



विद्यापीठ कॅम्पस

तसेच ७५ प्रकल्पांच्या प्रतिकृती असे २७२ विद्यार्थी व संशोधकांनी संशोधन सादर केले. महोत्सवात कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हानिहाय तसेच विद्यापीठांतर्गत झालेल्या आविष्कार महोत्सवातील प्रत्येक गटामधून निवडलेल्या तीन विजेत्यांना त्यांचे संशोधन प्रकल्प प्रदर्शित करण्याची संधी देण्यात आली. सध्या आयुर्वेदिक उत्पादनांना आलेले महत्त्व लक्षात घेऊन या महोत्सवात मांडण्यात आलेल्या तुळशीपासून आइस्क्रिम या प्रकल्पाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तसेच उसाचे पाचट कापण्याचे यंत्र शेतकऱ्यांनी वापरल्यास त्यांच्या वेळ व शक्तीमध्ये कशी बचत होईल हे सांगणाऱ्या प्रकल्पालाही पसंती मिळाली. नोकरदार महिला, नोकरी व्यवसायानिमित्त घरापासून लांब राहणारे युवक यांच्यासाठी इंस्टंट फूडची गरज ओळखून विविध इंस्टंट फूड कसे बनवावे याबाबत संशोधन प्रकल्पाची मांडणी केली होती. प्लास्टिकमुक्त देश या संकल्पनेवर प्लास्टिकपासून इंधनाची निर्मिती याविषयीही संशोधन प्रकल्पाचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, महोत्सवाचे समन्वयक डॉ. शशिभूषण महाडिक, संयोजक डॉ. एस. बी. सादळे आदी उपस्थित होते.



"मुलांना एखादा विषय दिल्यास त्यावर त्यांच्या कल्पनांमधून संशोधन व्हावे यासाठी आविष्कार महोत्सवासारखे चांगले व्यासपीठ विद्यार्थ्यांना मिळाले. शेतकऱ्यांपासून उद्योजकांपर्यंतसाठी उपयुक्त उपकरणे विद्यार्थ्यांच्या संशोधनातून प्रत्यक्ष वापरात येऊ शकतात हा विश्वास देणारा हा महोत्सव होता.

**डॉ. जयदीप बागी**, संचालक, तंत्रज्ञान अधिविभाग

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
दि. 09-01-2020
तरुण भारत

# गांधीजींमुळे भारतीय राजकारणाला नैतिक अधिष्ठान



- डॉ. न. गो. राजूरकर यांचे प्रतिपादन
- उषा मेहता व्याख्यानमाला

प्रतिनिधी
कोल्हापूर

भारतीय राजकारणाला सर्वार्थाने नैतिक अधिष्ठान प्रदान करून त्याचे महत्त्व सातत्याने अधोरेखित करण्याचे कार्य राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी केले आहे. असे प्रतिपादन हैद्राबाद येथील उस्मानिया विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागाचे माजी प्राध्यापक डॉ. न. गो. राजूरकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अध्यसन केंद्रामार्फत आयोजित प्रा. डॉ. उषा मेहता स्मृती व्याख्यानमालेत 'महात्मा गांधींचे राजकीय नेतृत्व" या विषयावर ते बोलत होते. मानव्यशास्त्र सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत व राजकीय विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर होते.

डॉ. राजूरकर म्हणाले, समकालीन राजकारणामध्ये सर्व प्रकारच्या नैतिकतेला अत्यंत मागचे स्थान असल्याचे दिसून येते. गांधीजींनी जाणीवपूर्वक राजकारणातील साध्य व साधन या दोहोंच्या अनुषंगाने नैतिकतेचा आग्रह धरल्याचे व व्यक्तीगत जीवनात तिचा अवलंब केल्याचे दिसून येते. त्यामुळे महात्मा गांधी यांचे राजकारण आजच्या काळात आदर्श असले तरी त्या मार्गाचा अवलंब करणे आजच्या राजकीय नेतृत्वाला सहजशक्य नाही. तथापि, चांगले राजकीय नेतृत्व हे महात्मा गांधी यांच्या नैतिक मार्गाच्या आचरणातूनच घडणे शक्य आहे, हेही तितकेच खरे आहे.

महात्मा गांधी हे दक्षिण आफ्रिकेतून भारतात आले, तेव्हा काही मोजक्या शिक्षित लोकांनाच त्यांची माहिती होती. भारतीय राजकारणात प्रवेश करीत असताना ओळख निर्माण करण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर होते. तथापि, पुढच्या अवघ्या पाच वर्षांतच इथल्या प्रत्येक सर्वसामान्यांपर्यंत गांधीजी पोहोचू शकले, कारण त्यांच्या प्रश्नांची ठाम उत्तरे त्यांच्याकडे होती. हेही त्यांच्या राजकारणाचे फार महत्वाचे वैशिष्ट्य होते, असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय मनोगत डॉ. अशोक चौसाळकर यांनी व्यक्त केले. यावेळी गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर नेहा वाडेकर यांनी आभार मानले. श्रेयस मोहिते यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी विविध अधिविभागांसह महाविद्यालयांतील प्राध्यापक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठात उद्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

दे. भ. रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कै. आर. एन. गोडबोले अध्यासन, शिवाजी विद्यापीठ तसेच मीडिया पार्टनर दै. 'पुढारी' पब्लिकेशन प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने 'शाश्वत विकासासमोरील जागतिक आव्हाने' या विषयावर दोन दिवसांच्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. ही परिषद शिवाजी विद्यापीठातील मानव्यविद्या सभागृहात होणार आहे.

परिषदेचे उद्‌घाटन शुक्रवारी (दि. १०) स. १०.३० वा. कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा सौ. रजनीताई मगदूम यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व अमेरिकेतील मिशिगन विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. रॉडने एच. क्लारकेन हे उपस्थित राहणार आहेत. या परिषदेसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी केले आहे.

# विठू माऊलीच्या गजरात ग्रंथदिंडीचे उद्घाटन

## विद्यापीठात मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यास प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

टाळ मृदुंगाच्या निनादात, विठू माऊलीचा गजर करत, वारकरी भजन अशा भक्तिमय वातावरणात ग्रंथदिंडीने शिवाजी विद्यापीठाच्या मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे उद्घाटन झाले. यापुढे पंधरवडाभर मराठी भाषेच्या अनुषंगाने अनेकविध कार्यक्रम व उपक्रमांचे आयोजन मराठी अधिविभागाच्या वतीने करण्यात येणार आहे. या दिंडीचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात विठू माऊलीच्या गजरात ग्रंथदिंडीला प्रारंभ झाला. यावेळी प्र. कुलगुरू डॉ. डी. टी.शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, व्ही. टी. पाटील, डॉ. नमिता खोत. (छाया : तय्यब अली)**

या ग्रंथदिंडीत विठ्ठल मंदिर भजनी मंडळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर, महादेव रामचंद्र यादव ग्रुप भजनी मंडळ, टोप, पांडुरंगनगरी महिला भजनी मंडळ, कोल्हापूर यांच्यासह महे, कसबा बीड, कासारवाडी, पाचगाव, प्रयाग चिखली, सिद्धनेर्ली, हणमंतवाडी या ठिकाणांच्या भजनी मंडळांसह सांगलीच्या विलिंग्डन महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले.

मुख्य इमारतीपासून ते वि. स. खांडेकर भाषा भवनपर्यंत निघालेल्या या दिंडीमुळे विद्यापीठातील अवघे वातावरण भक्तिमय होऊन गेले. दिंडी भाषा भवन येथे पोहोचल्यानंतर सभागृहामध्येही पारंपरिक वारकरी भजनांचेही मोठ्या भक्तिमय वातावरणात सादरीकरण झाले.

या मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याअंतर्गत ग्रंथ प्रकाशन, युनिकोड कार्यशाळा, लेखक-विद्यार्थी संवाद, परिसंवाद, प्रमाण मराठी लेखन कार्यशाळा आणि म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार वितरण सोहळा आदी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.




**ग्रंथदिंडी**

कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. अक्षय सरवदे, डॉ. नंदकुमार मोरे उपस्थित होते.

# नवसंकल्पनांना वाव देणारा आविष्कार महोत्सव

## प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; महोत्सवाचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मर्यादित स्रोतांमधून अधिकाधिक लोकांना परिपूर्ण सेवा-सुविधा पुरवण्यासाठी नवकल्पनांना संधी देणारा महोत्सव म्हणजे आविष्कार संशोधन महोत्सव होय, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के यांनी केले. आविष्कार महोत्सवाचे उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले.




**कोल्हापूर : आविष्कार महोत्सव कार्यक्रमात बोलताना प्र.कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. व्यासपीठावर उपस्थित जय बागी, डॉ. विलास नांदवडेकर आदी.**

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, मुलभूत आविष्कार एखाद्या देशाच्या यशासाठी महत्त्वपूर्ण आहे. मर्यादित स्रोतांमधून अधिकाधिक लोकांना परिपूर्ण सेवा-सुविधा पुरवण्यात सक्षम असलेल्या नवकल्पना आणि मानवी विकास याकडे देशाचे लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

डिपार्टमेंट ऑफ टेक्नोलॉजीचे संचालक डॉ. जयदीप बागी म्हणाले, काईझेन या जपानीस तत्त्वज्ञानाप्रमाणे सतत सुधारणा व याकरिता आवश्यक असणारे बदल अंगीकारणे महत्त्वाचे आहे.

कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, महोत्सवाचे समन्वयक डॉ. शशिभूषण महाडिक, संयोजक डॉ. एस. बी. सादळे आदी उपस्थित होते.

महोत्सवात कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हानिहाय तसेच विद्यापीठांतर्गत झालेल्या आविष्कार महोत्सवातील प्रत्येक गटामधून निवडलेल्या तीन विजेत्यांना त्यांचे संशोधन प्रदर्शित करण्याची संधी देण्यात आली. महोत्सवात १९७ पोस्टर प्रदर्शन तसेच ७५ प्रकल्पांच्या प्रतिकृती असे २७२ विद्यार्थी व संशोधकांनी संशोधन सादर केले. यामध्ये उद्योजकता कौशल्य विकासचा अभ्यास, तुळशीपासून आयुर्वेदिक आइस्क्रीम, इंटरनेटचा वापर आणि नैराश्य, पाम तेलापासून बायो-फ्युएल, गायीच्या दुधापासून इन्स्टंट शिरा, प्लास्टिकपासून इंधननिर्मिती, अशी अनेकविध प्रकारचे संशोधने प्रदर्शित केली गेले.

# दिव्यांगांना सुविधा दिल्यास जीवनमान उंचावेल

## डॉ. ताहा हाजिक : एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विज्ञान आणि तंत्रज्ञानाची जोड देऊन त्यांना योग्य त्या सुविधा दिल्यास त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होईल, असे प्रतिपादन गोवा येथील सामाजिक कल्याण संचालनालयाचे विशेष कार्यकारी अधिकारी डॉ. ताहा हाजिक यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र व समावेशी शिक्षण संसाधन केंद्र आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'डेव्हलपमेंट ऑफ अॅक्सेसिबल लायब्ररी फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलिटीज' या विषयावर विद्यापीठ, महाविद्यालयीन, सार्वजनिक ग्रंथपाल यांच्यासाठी आयोजित एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.


डॉ. हाजिक म्हणाले, दिव्यांगांना सामाजिक बांधिलकी ठेवून सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केल्यास या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहन मिळेल. उच्च शिक्षण प्रणालीमध्ये ग्रंथालय हा अत्यंत महत्त्वपूर्ण घटक आहे. आजच्या काळात, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी डिजिटल ग्रंथालये, मोबाईल ग्रंथालये, सर्वसमावेशक ग्रंथालये, प्रवेश करण्यायोग्य ग्रंथालये असणे गरजेचे आहे. सर्व शैक्षणिक संस्था तसेच महाविद्यालयांच्या ग्रंथालयांमध्ये दिव्यांगांना सहज उपलब्ध होणारे अभ्यासक्रमांचे साहित्य देऊन दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विविध कौशल्यपूर्ण रोजगाराभिमुख अभ्यासक्रम निर्माण करण्याची गरज आहे.




**कोल्हापूर : दिव्यांगविषयक आयोजित कार्यशाळेत बोलताना गोव्याच्या सामाजिक कल्याण संचालनालयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. ताहा हाजिक. डावीकडून डॉ. पी. बी. बिलावर, डॉ. नमिता खोत, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. सारा डुव्हल आदी.**

अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयांनी पुढाकार घेऊन दिव्यांगांसाठी सर्व सोयी-सुविधांनी सुसज्ज ग्रंथालये निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे.

यावेळी यूएसए येथील फुलब्राईट स्कॉलर डॉ. सारा डुव्हल, धनंजय भोले, बुकशेअर इंडिया (पुणे) च्या श्रीमती झैनाब चिनीकमवाला हे तज्ज्ञ उपस्थित होते. यावेळी शैक्षणिक संस्थेतील ग्रंथालयांत दिव्यांगांसाठी पूर्णस्वरूपी सुसज्ज असे दालन तयार करण्याबाबत मार्गदर्शन केले.



**शिवाजी विद्यापीठातून**

विद्यापीठाच्या ग्रंथपाल समन्वयक डॉ. नमिता खोत यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कार्यक्रम समन्वयक डॉ. डी. बी. सुतार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. पी. बी. बिलावर यांनी आभार मानले. यावेळी डॉ. सी. ए. लंगरे, डॉ. एम. एस. वासवानी, डॉ. एन. जे. बनसोडे, विलास सोयम विविध राज्यांतील महाविद्यालयीन ग्रंथपाल व दिव्यांग विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यापीठात मराठी भाषा पंधरवड्याला प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पारंपरिक वारकरी भजने, विठुमाऊलीचा गजर अन् त्याला टाळ मृदुंगाची साथ अशा अत्यंत भक्तिमय, उत्साही वातावरणात निघालेल्या ग्रंथदिंडीने शिवाजी विद्यापीठाच्या मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे बुधवारी उद्घाटन झाले. विभागाच्या वतीने १५ दिवस कार्यक्रम व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.


शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. अक्षय सरवदे, डॉ. नंदकुमार मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पालखी पूजनाने ग्रंथदिंडीस प्रारंभ झाला.

ग्रंथदिंडीत विठ्ठल मंदिर भजनी मंडळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर, महादेव रामचंद्र यादव ग्रुप भजनी मंडळ, टोप, पांडुरंगनगरी महिला भजनी मंडळ, कोल्हापूर यांच्यासह महे, कसबा बीड, कासारवाडी, पाचगाव, प्रयाग चिखली, सिद्धनेर्ली, हणमंतवाडी या ठिकाणच्या भजनी मंडळांसह सांगलीच्या विलिंग्डन महाविद्यालयातील तीस विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले. मुख्य इमारतीपासून ते वि. स. खांडेकर भाषा भवनपर्यंत निघालेल्या या दिंडीमुळे विद्यापीठातील अवघे वातावरण नादमय होऊन निघाले.

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यांतर्गत ग्रंथ प्रकाशन, युनिकोड कार्यशाळा, लेखक-विद्यार्थी संवाद, परिसंवाद, प्रमाण मराठी लेखन कार्यशाळा आणि म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार वितरण सोहळा आदी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# गांधीजींमुळे भारतीय राजकारणाला नैतिक अधिष्ठान

## डॉ. न. गो. राजूरकर : प्रा. डॉ. उषा मेहता व्याख्यानमाला



**प्रा. डॉ. न. गो. राजूरकर**

कोल्हापूर, ता. ८ : भारतीय राजकारणाला सर्वार्थाने नैतिक अधिष्ठान प्रदान करून त्याचे महत्त्व सातत्याने अधोरेखित करण्याचे कार्य महात्मा गांधी यांनी केले, असे प्रतिपादन हैद्राबादच्या उस्मानिया विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभागाचे माजी प्राध्यापक डॉ. न.गो. राजूरकर यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्रामार्फत आयोजित प्रा. डॉ. उषा मेहता स्मृती व्याख्यान मालेअंतर्गत 'महात्मा गांधीचे राजकीय नेतृत्व' या विषयावर ते बोलत होते. मानव्यशास्त्र सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजकीय विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर होते. डॉ. राजूरकर म्हणाले, समकालीन राजकारणामध्ये सर्व प्रकारच्या नैतिकतेला अत्यंत मागचे स्थान असल्याचे दिसून येते. या पार्श्वभूमीवर महात्मा गांधी यांच्या राजकारणाकडे पाहिले असता अत्यंत आदर्श राजकारणाचे ते मूर्तीमंत प्रतीक असल्याचे दिसून येते.'

यावेळी डॉ. चौसाळकर यांना वर्धा येथील यशवंत दाते स्मृती संस्थेचा डॉ. यशवंत सुमंत स्मृती जीवन गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल गांधी अभ्यास केंद्रातर्फे प्रा. राजूरकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी गांधी अभ्यास केंद्रच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर नेहा वाडेकर यांनी आभार मानले. श्रेयस मोहिते यांनी सूत्रसंचालन केले.

दि. 09-01-2020

तरुण भारत

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात नवसंशोधनांचा 'अविष्कार'



## कोल्हापूर, सांगली, साताऱ्यातून २७२ विद्यार्थी संशोधकांचे प्रबंध सादर : तंत्रज्ञान विभागात महोत्सव

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागात बुधवारी नवसंशोधक विद्यार्थ्यांनी विविध, नव्या विषयांवरील संशोधनांचा 'अविष्कार' केला. निमित्त होते शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागामध्ये अविष्कार संशोधन महोत्सवाचे. उद्योजकता कौशल्य विकासचा अभ्यास, तुळशीपासून आयुर्वेदिक आईस्क्रीम, इंटरनेटचा वापर आणि नैराश्य, पामतेलापासून बायो–फ्युएल, ग्रामीण भागाकरिता सौरउर्जेवर चालणारी सिंचनव्यवस्था, वणव्याचा धोका असणाऱ्या वनक्षेत्राचे सर्वेक्षण, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांची भावनिक बुद्धिमत्ता विकास कार्यक्रमाचा अभ्यास, गायीच्या दुधापासून इन्स्टंट शिरा, प्लॅस्टिकपासून इंधननिर्मिती, इन्स्टंट प्रॉन्झ करी, उसाचे पाचट कापणी यंत्र, ऑटोक्लेव्ह टेस्ट ट्यूबसाठी डिटॅचेबल कॅप अशा अनेकविध प्रकारचे संशोधन यावेळी प्रदर्शित केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागामध्ये अविष्कार संशोधन महोत्सवाचे उद्‌घाटन करताना प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. जयदीप बागी आदि.

शिवाजी विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सव तंत्रज्ञान विभागामध्ये बुधवारी उत्साहात पार पडला. सकाळी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागाच्या सभागृहामध्ये अविष्कार महोत्सवाचे उदघाटन प्र–कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले.

प्र–कुलगुरु डॉ. शिर्के म्हणाले, मूलभूत अविष्कार एखाद्या देशाच्या यशासाठी महत्त्वपूर्ण आहे. मर्यादित स्त्रोतांमधून अधिकाधिक लोकांना परिपूर्ण सेवासुविधा पुरवण्यात सक्षम असलेल्या नवकल्पना आणि मानवी विकास याकडे देशाचे लक्ष्य केंद्रित करणे आवश्यक आहे.

काईझेन या जपानीस तत्वज्ञानाप्रमाणे सतत सुधारणा व याकरिता आवश्यक असणारे बदल अंगीकारणे महत्वाचे आहे, असे डिपार्टमेंट ऑफ टेक्नोलॉजीचे संचालक डॉ. जयदीप बागी म्हणाले.

महोत्सवात कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हा तसेच विद्यापीठांतर्गत झालेल्या अविष्कार महोत्सवातील प्रत्येक गटामधून निवडलेल्या तीन विजेत्यांना त्यांचे संशोधन प्रदर्शित करण्याची संधी देण्यात आली. महोत्सवात १९७ पोस्टर प्रदर्शन तसेच ७५ प्रकल्पांच्या प्रतिकृती असे २७२ विद्यार्थी व संशोधकांनी संशोधन सादर केले.

# विठुमाउलीच्या गजरात मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यास प्रारंभ

प्रतिनिधी
कोल्हापूर

विठुमाऊलीचा गजर अन् त्याला टाळ मृदुंगाची साथ अशा भक्तिमय, उत्साही वातावरणात निघालेल्या ग्रंथदिंडीने शिवाजी विद्यापीठाच्या मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे बुधवारी उद्‌घाटन झाले. पंधरा दिवस मराठी भाषेच्या अनुषंगाने विविध कार्यक्रम व उपक्रमांचे आयोजन मराठी अधिविभागाने केले आहे. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर सकाळी प्र–कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. अक्षय सरवदे, डॉ. नंदकुमार मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पालखी पूजनाने ग्रंथदिंडीस प्रारंभ करण्यात आला. या ग्रंथदिंडीत विविध भजनी मंडळांनी भाग घेतला. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याअंतर्गत ग्रंथ प्रकाशन, युनिकोड कार्यशाळा, लेखक–विद्यार्थी संवाद, परिसंवाद, प्रमाण मराठी लेखन कार्यशाळा आणि म.सु. पाटील समीक्षा पुरस्कार वितरण सोहळा असा भरगच्च कार्यक्रम या पंधरवड्यात होणार आहे.